# चक्रीवादळग्रस्तांना ५० लाखांची मदत

## फिनोलेक्स पाइप्स, मुकुल माधव फाउंडेशन, हिंदुजा फाउंडेशनचा पुढाकार

प्रभात वृत्तसेवा



**पुणे, दि. २८-** फिनोलेक्स पाइप्स, मुकुल माधव फाउंडेशन व हिंदुजा फाउंडेशनतर्फे रत्नागिरी, रायगडमध्ये चक्रीवादळग्रस्तांना ५० लाख रुपयांची मदत करण्यात आली. काही दिवसांपूर्वी आलेल्या 'निसर्ग' चक्रीवादळामुळे कोकणातील अनेक गावांना मोठा तडाखा बसला होता. अनेकांचे संसार उघड्यावर पडले होते. या दोन जिल्ह्यांतील ३३३ कुटुंबांना उभे करण्याचे काम मुकुल माधव फाउंडेशनच्या पुढाकारातून झाले आहे.

दापोली व मंडणगड तालुक्यांतील १२०, तर रायगड जिल्ह्यातील ताळा, श्रीवर्धन व दिवेआगार या तालुक्यातील २१३ कुटुंबाना घरावरील पत्रे, सोलर लाइट, ब्लँकेट, धान्य आदी वस्तू देण्यात आल्या.

याबद्दल अधिक माहिती देताना मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया म्हणाल्या, 'निसर्ग चक्रीवादळामुळे कोकणातील अनेक गावांना मोठा फटका बसला आहे. यांना काहीसा दिलासा देण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला. ज्यांना काहीच आधार नाही, अशा गरजू कुटुंबाना ही मदत स्थानिक प्रशासनाच्या मदतीने देण्यात आली आहे.'